REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 9 | ISSUE - 4 | JANUARY - 2020

# नागपूर जिल्हयातील बँक ऑफ बडोदा बँकेच्या स्तरावरील शासकीय धोरणात्मक योजनांचे मुल्यमापन : एक अध्ययन

धम्मपाल ह. गेडाम[1] , डॉ. सुरेश ए. भागवत[2]
[1]संशोधक
[2]मार्गदर्शक, (एम. कॉम, एम.फिल, पी.एच.डी.)
पी. डब्ल्यु. एस. महाविद्यालय, नागपूर.

## सारांश

राष्ट्रीयीकृत बँका अंतर्गत तालुकास्तरावर ज्या योजना राबविण्यात येत आहे त्या योजनांचा शेतकऱ्यांना खुप मोठया प्रमाणात लाभ होत असल्यामुळे महाराष्ट्रात नागपूर जिल्हयामध्ये येणाऱ्या प्रत्येक तालुक्यातील उत्पन्नामध्ये मोठया प्रमाणात वाढ होतांना दितस आहे. त्यामुळे शासनाद्वारे त्यांची दखल घेवून उत्पादन वाढविण्यासाठी कृषी विद्यापीठातील तंज्ञानी ज्या योजना राबविण्यात येत आहे. त्यामध्ये संशोधन करून नवीन योजना अमलात आणून उत्पादनात सातत्याने वाढ घेत आहे. व त्या योजना शेतकऱ्यांमध्ये त्या योजना मोठया प्रमाणात लोकप्रिय होत आहे. प्रस्तुत संशोधनात नागपूर एकूण ५०० शेतकऱ्यां लाभार्थी कडुन संकलीत करण्यात आलेल्या माहितीचे विश्लेषण करण्यात आले. संकलीत तथ्यांच्या विश्लेषणाकरीता विविध सांख्यिकीय पद्धतींचा वापर करण्यात आला.




## प्रस्तावना

कृषी व्यवसाय हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे. देशातील रोजगार, व्यापार, कारखानदारी, निर्यात व इतर कोणत्याही दृष्टिने कृषीविकास महत्वाचा आहे. भारतात शेतीचा विकास झाल्याशिवाय आर्थिक विकासाला चालना मिळत नाही, हा आतापर्यंतचा अनुभव आहे. भारताच्या शेती विकासात अनेक अडचणी आहे. शेतीला योग्यवेळी, योग्य प्रमाणात, योग्य व्याजदराने कर्जपुरवठा झाल्याशिवाय शेतीचा खऱ्या अर्थाने विकास होणार नाही. कृषी क्षेत्राला सढळ पतपुरवठा करण्याची आवश्यकता अनेकांनी अनेकवेळा व्यक्त केली आहे. तसेच त्या दृष्टीने थोडेफार प्रयत्नदेखील झाले आहेत. परंतु खाजगी व्यापारी बँका खेडयात जाण्यास आणि शेतकऱ्यांना

पतपुरवठा करण्यास फारशा उत्सुक नव्हत्या. कारण शेतकऱ्यांना पतपुरवठा करतांना सुरक्षितता आणि लाभता यांसारख्या पारंपारिक बॅकिंग तत्वांचा त्याग करावा लागतो. शेतकऱ्यांना पतपुरवठा करतांना सामाजिक लाभ महत्वाचा मानावा लागतो. खाजगी क्षेत्रातील बॅकांकडून असा बदल अपेक्षित नाही. तेव्हा चौदा बॅकांच्या राष्ट्रीयीकरणाचा निर्णय घेण्यात आला. भारतातील व्यापारी बॅकांच्या राष्ट्रीयीकरणामुळे कृषी क्षेत्राला सढळ पतपुरवठा सुरु झाला. एक तर राष्ट्रीयीकरणानंतर ग्रामीण भागात व्यापारी बॅकांचा शाखाविस्तार मोठया प्रमाणात झाला. त्यामुळे भारतातील खेडयांतून बॅकींगची सेवा उपलब्ध झाली. सन १९६९ पासुन ग्रामीण भागातील शेतकऱ्यांची कर्जे खातेदारांची संख्या आणि कृषी पतपुरवठयाची रक्कम यात खूप वाढ झाल्याचे दिसते. सन १९६९ मध्ये कृषी कर्ज खातेदारांची संख्या १.६५ लाख तर कर्जाची रक्कम रु. १६२ कोटी होती. सन १९९० मध्ये यात अनुक्रमे २२२ लाख आणि रु. १६४३४ कोटी याप्रमाणे वाढ झाली. सन १९६९ मध्ये भारतातील व्यापारी बॅकांच्या एकूण पतपुरवठयापैकी कृषी क्षेत्राचा वाटा १.३% होता. तो सन १९९० मध्ये १६.७% पर्यंत वाढला. यातदेखील लहान शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात पतपुरवठा होत आहे.

**सारणी क्रं. १ नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योजनांच्या माहितीच्या स्त्रोतासंबंधी माहिती**

| योजनांच्या माहितीचे स्त्रोत | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| ग्रामसेवक | ४३ | १२.४ |
| कृषी अधिकारी | १० | २.७ |
| प्रसार माध्यमे (रेडीयो, टि.व्ही., वर्तमानपत्र, जाहिरात इ.) | ७४ | २१.० |
| शेजारी शेतकरी | ४६ | १३.१ |
| मित्र | ३६ | १०.४ |
| नातलग | २७ | ७.७ |
| शेतकरी मेळावे | १८९ | ५४.१ |

वरील सारणी क्रमांक १ मध्ये नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योजनांच्या माहितीच्या स्त्रोतासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५४.१ टक्के शेतकऱ्यांना योजनांची माहिती शेतकरी मेळाव्यात प्राप्त झाली असून २१.० टक्के शेतकऱ्यांना योजनांची माहिती प्रसार माध्यमां द्वारे (रेडीयो, टि.व्ही., वर्तमानपत्र, जाहिरात इ.) प्राप्त झाली. त्याचप्रमाणे योजनांच्या माहितीचे स्त्रोत शेजारी शेतकरी, ग्रामसेवक, मित्र, नातलग व कृषी अधिकारी असणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी क्रमशः १३.१ टक्के, १२.४ टक्के, १०.४ टक्के, ७.७ टक्के व २.७ टक्के होती.

**सारणी क्रमांक २: नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योजनांपासून झालेल्या लाभाच्या स्तरांसंबंधी माहिती**

| योजनांच्या लाभाचे स्तर | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उत्कृष्ट | ०८ | २.३ |
| उत्तम | १९ | ५.३ |
| समाधानकारक | १५६ | ४४.६ |
| अत्यल्प | १०३ | २९.६ |
| लाभ झाला नाही | ६४ | १८.३ |
| **एकुण** | **३५०** | **१००** |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***430.014*** | ***4*** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक २ मध्ये नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योजनांपासून झालेल्या लाभाच्या स्तरांसंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ४४.६ टक्के शेतकऱ्यांना योजनेंपासून झालेल्या लाभाचे स्तर समाधानकारक स्वरूपाचे असून २९.६ टक्के शेतकऱ्यांना योजनेंपासून अत्यल्प स्वरूपाचा लाभ झाला. तसेच १८.३ टक्के शेतकऱ्यांना योजनेंपासून कोणताही लाभ झाला नाही. त्याचप्रमाणे योजनेंपासून उत्तम व उत्कृ ष्ट स्वरूपाचा लाभ प्राप्त करणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी क्रमशः ५.३ टक्के व २.३ टक्के होते. योजनांपासून झालेल्या लाभाच्या स्तरांसंबंधी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Chi Squqre = 430.014, df = 4, Sig. <0.05) फरक असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक ३: उपरोक्त योजनांमुळे आर्थिक स्थितीत लाभ होण्यासंबंधी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रीया**

| योजनांमुळे आर्थिक स्थितीत लाभ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २५८ | ७३.७ |
| नाही | ९२ | २६.३ |
| **एकुण** | **३५०** | **१००** |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***157.463*** | ***1*** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक ३ मध्ये योजनांमुळे आर्थिक स्थितीत लाभ होण्यासंबंधी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ७३.७ टक्के शेतकऱ्यांना योजनांमुळे आर्थिक स्थितीत लाभ झाला असून, केवळ २६.३ टक्के शेतकऱ्यांना योजनांमुळे आर्थिक स्थितीत लाभ झाला नाही. योजनांमुळे आर्थिक स्थितीत लाभ

होण्यासंबंधी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Chi Squqre = 157.463, df = 1, Sig. <0.05) फरक असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक ४: नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योजनांमुळे झालेल्या आर्थिक लाभाच्या स्वरूपासंबंधी माहिती**

| योजनांमुळे झालेल्या आर्थिक लाभाचे स्वरूप | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| उत्तम | ७८ | ३०.२ |
| काही प्रमाणात | १३५ | ५२.१ |
| अत्यल्प | ४६ | १७.६ |
| एकूण | २५९ | १०० |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***93.219*** | **2** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक ४ मध्ये नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांना योजनांमुळे झालेल्या आर्थिक लाभाच्या स्वरूपासंबंधी माहिती दर्शविण्यात आली आहे. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ५२.१ टक्के शेतकऱ्यांना योजनांमुळे काही प्रमाणात आर्थिक लाभ झाला असून ३०.२ टक्के शेतकऱ्यांना योजनांमुळे उत्तम स्वरूपाचा आर्थिक लाभ झाला. तसेच १७.६ टक्के शेतकऱ्यांना योजनांमुळे अत्यल्प आर्थिक लाभ झाला असल्याचे निदर्शनास आले. योजनांमुळे झालेल्या आर्थिक लाभाच्या स्वरूपासंबंधी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Chi Square = 93.219, df = 2, Sig. <0.05) फरक असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक ५.: योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ होण्यासंबंधी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रीया**

| योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | १७४ | ६०.७ |
| नाही | ८९ | ३१.१ |
| सांगता येत नाही | २४ | ८.२ |
| एकूण | २८६ | १०० |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***237.276*** | **2** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक ५ मध्ये योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ होण्यासंबंधी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार

योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी ६०.७ टक्के शेतकऱ्यांच्या जागरूकतेत वाढ झाली असून, योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी ३१.१ टक्के शेतकऱ्यांच्या जागरूकतेत वाढ झाली नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ होण्याबाबत अनभिज्ञ असणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी ८.२ टक्के आहे. योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी जागरूकतेत वाढ होण्याबाबत शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Chi Suqre = 237.276, df = 2, Sig. <0.05) फरक असल्याचे निदर्शनास आले.

**सारणी क्रमांक ६: मागील दहा वर्षात योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित असण्यासंबंधी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रीया**

| योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित | संख्या | टक्केवारी |
|---|---|---|
| होय | २०८ | ७२.७ |
| नाही | १९ | ६.५ |
| सांगता येत नाही | ६० | २०.८ |
| **एकूण** | **२८६** | **१००** |
| ***Chi Square*** | ***Df*** | ***Sig*** |
| ***417.087*** | **2** | ***0.000*** |

**df- स्वातंत्र्यांश; Sig. – सार्थकता**

वरील सारणी क्रमांक ६ मध्ये मागील दहा वर्षात योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित असण्यासंबंधी नागपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या प्रतिक्रीया दर्शविण्यात आल्या आहेत. सारणीत दर्शविलेल्या माहितीनूसार ७२.७ टक्के शेतकऱ्यांच्या मते मागील दहा वर्षात योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित असून, ६.५ टक्के शेतकऱ्यांच्या मते मागील दहा वर्षात योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित नसल्याचे निदर्शनास आले. त्याचप्रमाणे मागील दहा वर्षात योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित असण्यासंबंधी अनभिज्ञ असणाऱ्या शेतकऱ्यांची टक्केवारी २०.८ टक्के आहे. मागील दहा वर्षात योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित असण्यासंबंधी शेतकऱ्यांदरम्यान सार्थक (Chi Suqre = 417.087, df = 2, Sig. <0.05) फरक असल्याचे निदर्शनास आले.

## निष्कर्ष

- बहुतांश शेतकऱ्यांना योजनेंपासून झालेल्या लाभाचे स्तर सामान्य स्वरूपाचे आहे.
- बहुतांश शेतकऱ्यांना योजनांमुळे आर्थिक स्थितीत लाभ झाला.
- बहुतांश शेतकऱ्यांना योजनांमुळे काही प्रमाणात आर्थिक लाभ झाला.
- योजनांमुळे कृषी आधारित जोड व्यवसायांसंबंधी बहुतांश शेतकऱ्यांच्या जागरूकतेत वाढ झाली.
- बहुतांश शेतकऱ्यांना असे वाटते की, मागील दहा वर्षात योजनांचा प्रसार आणि प्रचार होवून सुद्धा काही शेतकरी वर्ग या योजनांच्या लाभापासून वंचित आहेत.

## संदर्भ ग्रंथसूची


१. डॉ. एस. व्ही. ताठे, महाराष्ट्राचा भूगोल, चिन्मय प्रकाशन, औरंगाबाद, १५ जुलै २०१६
२. काटे के.बी., 'बँकिंग', फडके प्रकाशन, प्रथम आवृत्ती, कोल्हापूर, २००४.
३. प्रा. सराफ मोहन, 'बँकिंग तत्त्व स्वरुप आणि भारतीय बँक', राविल पब्लिकेशन, तिसरी आवृत्ती, सातारा, १९७२.
४. सुराणा राजकुमारी, (2000) भारत में लोकतांत्रिक विकेंद्रीकरण और नवपंचायतीराज, राज पब्लिकेशिंग हाऊस, जयपूर.
५. पाटील वा. भा., (१९९९) प्रशासन व्यवस्था ( भारत, इंग्लंड, अमेरिका व फ्रान्स येथील कर्मचारी प्रशासन पद्धती), श्री मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर.
६. मार्गदर्शिका (१९६१) महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समिती अधिनियम, चौधरी लॉ पब्लिशर्स, पुणे.
७. भगणे पा. र. (२०१२) भारतातील स्थानिक स्वराज्य संस्था, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव.
८. भांडारकर, पु.ल. (१९७६) सामाजिक संशोधनपद्धती, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथ निर्मिती मंडळ,(दत्तराज प्रकाशन), नागपुर.
९. लोटे रा. ज. भारतातील स्थानिक स्वशासन, पिंपळापुरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.
१०.पाटील, जे. एफ., पठाण, के. जी., ताम्हणकर, पी. जे. व यादव, एस. बी. (२०१२) अर्थशास्त्रीय संशोधनाची तोंडओळख, कॉन्टिनेंटल प्रकाशन, पुणे.
११.पाटील भा. वा. (१९९९) कर्मचारी प्रशासन, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.
१२.पाटील, वा. भ. (२००९) 'पंचायत राज', प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, प्रथम आवृत्ती.
१३.देशपांडे श्रीकांत (२०१२) लोकप्रशासन, श्री मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर.
१४. बंग आर. के., (२००५) भारतातील स्थानिक स्वशासन विशेष संदर्भ -महाराष्ट्र राज्य, श्री मंगेश प्रकाशन, रामदासपेठ, नागपूर.